कमलावती–असं होईल, तरच मी जगेन. तुमचं प्रेम हेंच माझ्या जीवनाचं कायमच साधन आहे, तर असें माझ्यावर त्रासू नका. या, आणि माझं चुंबन घ्या.

राजपुत्र–हां ! हें काम मात्र मी मोठ्या हौसेनं करीन.

[तिला मिठी मारतो व चुंबन घेतो. जातात पडदा पडतो.]

अंक २ रा.

प्रवेश ५ वा.

स्थळ–नंदनोद्यान बागेंतील सरदार रणधीररावांचें गृह.

वेळ–प्रातःकाळ.

लीलावती व गंभीरराव उभे असतां पडदा उघडतो.

लीलावती–हं ! माग सरा. असला लोचटपणा मला कधींही अवडायचा नाहीं.

गंभीरराव–शेवटीं तूं माझी गांठ घेतलीस, हे तुझे उपकार आहेत.

लीलावती–तुमची एकांतीं गांठ घ्यायला सापडावी ह्मणून बाबाबरोबर मी आज देवळांत गेलें नाहीं. पण या पुढं मात्र अशी चोरून एकांतीं गांठ पडणार नाहीं. समजलांत.

गंभीरराव–(दुःखानें)पण माझ्याकडून मुळींचं अप-राध न घडतां–मला शिक्षा व्हावी,–हा माझ्यावर नुस-ता गहजब !!!

लीलावती–अहो अशी खोटी शपत तरी तुह्मी घेऊं नका.

गंभीरराव–काय खोटी शपथ ! आणि मी तुझ्या-जवळ वाहीन, किडे पडतील माझ्या तोंडाला!

लीलावती–काय तुह्मी त्या पाजी राधाबाईच्या इथें जात नाहीं कां ? सांगा, खरं बोला आतां.

गंभीरराव–शपथपूर्वक खरं सांगतों. परवां मी एकदां गेलों होतों. पण तिचा थोडा फाजिलपणा दिसल्याबरोबर तिथून पाय काढला. तेव्हांपासून तिचा उंबराही चढलों नाहीं.

लीलावती–(जवळ जाऊन) खरं ना ! हें अगदीं खरं ना !

गंभीरराव–तुझीच शपथ ! खरं सांगतों मी ! तुझं जर माझ्यावर प्रेम राहणार नाहीं, तर मी प्राण देईन— अगर भयंकर तुमलयुद्धांत शिरून या देहाची आहुती देईन—(दोघांचें आलिंगन)

लीलावती–पण प्रिया, माझ्या बहिणीचा सत्यानास झाला हो ! तिला लुच्यांनीं फशिवलं ! अरेरे ! बिचारी माझी बहीण, तिचा अगदीं घात झाला. चांडाळानं तिचा गळा कापला हो ! ! !

गंभीरराव–लाडके थोडी शांत हो. धीर धर. तूं समजत आहेस अशाच साऱ्या गोष्टी असतील तस मला वाटत नाहीं. कमलेच्या प्रियकराला या राधाबाईच्या आंतल्या भानगडींची माहिती नसेल.

लीलावती–त्या पाजी बायकोच्या वत्तीनं एक शब्द सुद्धां तुह्मीं बोलूं नका तिची व तुमची ओळख होती व आपलं काम साधण्यासाठीं तुह्मी तिची मदत घेत होतां या गोष्टी मी आतां विसरेन. पण माझ्या बहिणीचा बचाव करण्याच्या कामीं तुह्मी मला मदत कराल तर

मात्र मी त्या विसरेन. शिवाय असं पहा, तुम्ही माझे पती झालां म्हणजे कमलाही तुमची मेव्हणी नाहीं कां होणार ? आणि तिची अब्रू राखण्यासाठीं झटणं हें तुमचं कर्तव्य नाहीं कां ? तिच्या विषयींची सारी हकीगत बाबांना तर सांगतां येत नाहीं. आणि तुम्हांला तर ती पहिल्यापासून पुरी ठाऊक आहे. तेव्हां या कामांत तुम्ही मला सहाय्य केलं पाहिजे. (तसबीर दाखवून) हा मदन-राव कोण याचा आधि पत्ता काढा, ओळखते कां ही तसबीर ! (ती त्याच्याजवळ तसबीर देते तो आश्चर्यानें पाहतो.)

गंभीरराव—काय म्हटलंस ! या गृहस्थाचं नांव मद-नराव ! छत्, हीं सारी सोंगं आहेत. माझ्या लाडके आतां अत्यंत वाईट वार्ता ऐकायला तयार हो—हा मदनराव दुसरा कोणी नसून राजपुत्रच आहे. हें मला पक्क ठाऊक आहे. तुझ्या बहिणीविषयीं याच्या मनांत यत्किंचित् सुद्धां चांगला विचार नसून त्याचं दुसरीशींच लग्न व्हायचं ठरलं आहे, असं मला कळलं आहे.

लीलावती—वायफळ शोक करायचा आतां मी सोड-तेंच,—पण प्रिया, आपण दोघं कमलेला न कळूं देतां तिच्या हितार्थ यत्न करूं; अहानां तुम्ही याला कबूल ?

गंभीरराव—अग सुंदरी, मला तूं नुसता हुकूम करीत जा, आणि त्या प्रमाणं व्यवस्था झालेली तूं पहात जा.

लीलावती—(पडद्याकडे पाहून) अगबाई पण ही अक्का आलीच, आतां तुम्ही इथून जा मग केव्हां तरी भेटूं.

गंभीरराव—हा पहा जातो. (जाऊन पुन्हां परत येऊन) पण एकदां तरी,—

लीलावती–अं हं ! हें काय मेलं ! (गंभीरराव पाय न वाजूं देतां जातो कमलावती येते तिच्याकडे लीला दुःखानें पहाते.)

लीलावती–(रडत) अक्का, तुझा घात झाला ग ! त्या मेल्यानं तुझा सर्वस्वी गळा कापला ! तुला अगदीं फशीं पाडलं बरं ! (स्फुंदून जास्त रडते.)

कमलावती–हं ! समजलें मी ! देवा ! सारं समजलें मी आतां—(दुःखानं रडते) अरेरे ! माझ्या सगळ्या सुखप्रद आशांच पूर्ण उन्मूलन झालं ना ? (पुन्हा रडें आवरून) पण नाहीं असं होणार ! (पुन्हा रडत) नाहीं काय ? माझं कपाळ फुटलं ! पिशाच्चच बनेन मी आतां. अरेरे ! अग आई !

लीलावती–अक्का, असं काय बरं करावं ! कांहीं तरी मनाला धीर दिला पाहिजे. माझ्याकड पहा गडे !

कमलावती–(रडत) सांग बाई ! काय दुःखकारक बातमी आणली आहेस. मला ऐकायला तयार झालं पाहिजे खरं ! पण हा जीव आवरून धरण्यासाठीं ज्या आशांतंतूंनां चिकटून रहाणं जरूर आहे, ते एकदम तोडवत नाहींत ग !

लीलावती–राजपुत्रावर आतां तूं प्रेम करावस हें कांहीं चांगलं नाहीं. तुझ्या मनांत अजून त्याची मूर्ती वास करीत असेल तर ती काढून टाक कशी!

कमलावती–अरेरे! देवा ! माझ्या अंतःकरणांत बिंबलेली त्यांची मूर्ती मी कशी काढून टाकूं ग ? त्यांच्यावर जडलेलं माझं प्रेम मी आतां कसं विसरूं ग ? अग, हें प्रेम ह्मणजे त्यांच्या खोटच्या हातानं माझ्या डोकींत घातलेलं फूल

कां आहे ? तें मला एकदम पांयांखालीं तुडवून टाकतां येईल कां ? छेगबाई असं कद्धीं घडणार नाहीं. तूंच आपल्या मनाकडं पहा, आणि गंभीरराववर तुझं प्रेम आहे, त्यावरून परिक्षा करून सांग पाहूं–प्रेम हें कांचेच्या भांड्या सारखं सहज फोडतां येईल कां ? अगर गुलाबाच्या कळी सारखं चिरडून टाकतां येईल कां ?

लीलावती–खरंच बाई, एकदां जडलेलं प्रेम कांहीं पुन्हां विसरतां यायचं नाहीं. पण अक्का आतां तूं पुढं करणार तरी काय ?

कमलावती–आतां मी काय करूंग ! अरेरे ! स्त्रियांचं पुरुषांवर जें परमशुद्ध, परमपवित्र, प्रेम जडत असतं, त्यानं माझं अंतःकरण कसं तुडुंब भरलेलं होतं ! पण आतां काय ? त्यानं त्याचे राई राई एवढाले तुकडे करून टाकलेग ! ताई, सांग आतां तूंच मला मी काय करूं तें ? शिकीव मला कांहीं तरी ! पण त्यांचं माझ्यावरचं प्रेम तरी अजून पहिल्या सारखं आहे कां ? कां झालं त्याचं वाटोळं !

लीलावती–तसं कांहीं तूं समजूं नको. पण त्याचं तुझ्यावर कितीही प्रेम असलं, तरी त्याच्या नादीं आतां तुला लागतां येणार नाहीं. त्यांत तुझाच दुर्लौकिक आहे. आतां मी काय सांगतें तें नीट लक्ष देऊन ऐक–पहिल्यानं आधीं आपलं दुःख आवर. हा जो तुझ्यावर कठीण प्रसंग आला आहे, त्याला आतां मोठ्या धैर्यानं तोंड दे ! तरच निभाव लागेल.

कमलावती–पण देवा ! हा माझ्यावरचा प्रसंग फारच कठीण आहे. एक माझ्या हातून आत्महत्या तरी होईल नाहीं तर मला वेड तरी लागेल.

लीलावती–अग अक्का, तुझ्यासारख्या फसलेल्या स्त्रीला विचार करण्यासारखे दोन मार्ग आहेत.

कमलावती–दोन मार्गना? मी समजलें कोणतें तें-वेड किंवा आत्महत्या.

लीलावती–असं बोलूं नकोस ग !! तूं असं ह्मटलंस ह्मणजे माझं मन दुःखानं गांगरून जाऊन मला कांहीं सुचेनासं होतं!

कमलावती–खरंच मी चुकलें! पण माझं डोकं कसं ठणकूं लागलं आहे. अग आई ग!

लीलावती–अक्का, जरा आंत चल, आणि थोडी स्वस्थ झोंप घे. ह्मणजे तुला बरं वाटेल!

[दोघी जातात पडदा पडतो.]

अंक २ रा

प्रवेश ६ वा.

स्थळ–राजवाड्यांतील राजपुत्राचा महाल, वेळ–प्रातःकाळ.

राजपुत्र झोंपेतून उठून आळेपिळे देऊन कपाळ धरतो व पलंगावर बसतो पडदा उघडतो.

राजपुत्र–(आत्मगत) छे! या कपाळ दुखण्यानं तर भंडावून सोडलं आहे. हे शिंच फुटलं तर बरं, असं मला वाटतं! काय करावं आतां! औषध तरी घेतों.(एका पेल्यांत दारू ओतून पितो.) हां! अस्स! (विचार करीत) मी कोण आहे, हें कमलेला तर कळलंच यांत शंका नाहीं पण हें ऐकून तिचं मन दुःखसागरांत बुडेल; किंवा ती सूड उगविण्याचा बेत करील, हें कांहींच समजत नाहीं. मोठंच कोडं पडलं आहे मला! शिवाय तें आमचं जुनं पात्र-

मालती, ती एक मोठीच ब्याद माझ्या मागं लागली आहे. आणखी तें परवांचं त्या तरुण पोरीचंही संधान फसलं. चोहोंकडून कशा मला सुऱ्या बोचताहेत. त्या मालतीच्या व माझ्या लग्नाचं प्रकर्ण जर कां राजेसाहेबांनां कळलं तर राज्यावरचा माझा हक्क सुद्धां जाईल. आतां कसं करावं ? पण छे ! असं नाहीं होतां उपयोग ! कसंही करून तें घोंगडं गळ्यांतलं काढलंच पाहिजे, आणि तें तरी ताबडतोब ! (पडद्याकडे पाहून) ओहो ! हा आमचा जुना मसलतगार आलाच. (गुलाबराव येतो) ये, माझ्या दोस्ता, मला तुझ्याशीं पुष्कळ बोलावयाचं आहे, आणि बऱ्याच कामगाऱ्या बजावण्याचं काम तुझ्यावर सोंपवायचं आहे.

गुलाबराव—इथपर्यंत मजल ठेपली कां ?

राजपुत्र—हो, त्या मालतीचं माझं काल खूपच भांडण झालं. मी एका सरदाराच्या बायकोला रंगमहालांत नेऊन तिच्यावर जुलूम करणार होतों. इतक्यांत तें ध्यान आपलं पलंगाखालून निघून येऊन आमच्यासमोर उभं राहिलं. मग मात्र माझा राग मी तिला दाखिवला. तीही खूप संतापली. त्या वेळेला त्या संतापाच्या आवेशांत तिनं त्या सरदारणीजवळ एक अगदीं गुप्त गोष्ट सांगितली,— आणि ती तुझ्याजवळही आतां मला सांगितलीच पाहिजे. पण तूं ही कुठं फुटणार नाहीं अशा व्यवस्थेनं वाग बरं !

गुलाबराव—आपण याबद्दल बिलकूल फिकीर करूं नये. आपली हरएक कामगिरी बजावण्यांत हें शीर गेलं तरी पत्करलं !

राजपुत्र—(इकड तिकड पहात हळू) ती गुप्त गोष्ट हीच कीं त्या मालतीशीं माझं गुप्त लग्न झालं आहे. पहिल्यानं मी तिला पाहिलं, त्या वेळेला तिच्या सौंदर्यानं मी अगदीं मोहित झालों. आणि मला अंगदींच वश करायला तिनं ज्या युक्त्या योजल्या, व जे फांसे टाकले त्यामुळं मी निव्वळ मूर्ख—वेडा—गाढवच बनून तिच्याबरोबर पुरोहितासमक्ष एकांतीं लग्न केलं. पण आतां त्या पुष्पवती राजकन्येशीं माझा विवाह करायचा राजेसाहेबांचा नक्की बेत ठरला आहे. त्यामुळं मी फारच पेंचांत सांपडल्यासारखा झालों आहे. कर्जानं तर मी अगदीं व्यापलोंच आहे. व सावकार मंडळी माझे घोडे जप्त करतील कीं काय ? अशी मला दहशत बसली आहे, यामुळं त्या पुष्पवती राजकन्येशीं लग्न लावायला तयार व्हायचा मी निश्चय केला आहे. पण या मालतीची ब्याद कशी काढावी ? सरळ रीतीनं ती कांहीं मला सोडणार नाहीं. यासाठीं कांहीं तरी वांकड्या युक्तीचीच योजना केली पाहिजे.

गुलाबराव—बरं, तुह्माला कुणी एखादी युक्ती सांगितली, आणि सरळ रीतीनं ह्मणा, अगर वाकड्या रीतीनं ह्मणा, मालतीबाईकडून तुमचं ह्मणणं कबूल करिवलं तर त्याला तुह्मी चांगलं बक्षीस द्याल कां ? आज तुमच्यानं देववणार नाहीं; पण पुढं तुह्मी गादीवर बसल्यावर तरी तें द्याल कां?

राजपुत्र—हो मोठ्या खुषीनं देईन. पण सांग सांग काय युक्ती योजणार तूं ?

गुलाबराव–अशा घाईनं युक्ती निघणार नाहीं विचार करायला मला कांहीं तरी वेळ पाहिजे. मग काढीन एखा-दी शक्कल! बरं, आणखीं कांहीं काम आहे? कां एवढच!

राजपुत्र–हो आणखीही एक काम आहे. हें पहा, मी एका तरूण पोरीला फसवून तिचं कौमार्य भ्रष्ट केलं आहे.

गुलाबराव–वाहवा! तुमचं चरित्र लिहिणाराला अशा गोष्टींची एक लांबच लांब मोठ्ठी माळ गुंफावी लागेल. पण तिचं नांव काय?

राजपुत्र–त्या पोरीचं नांव कमला, तिच्या बापाचं घराणं फारच कुलीन आहे.

गुलाबराव–सरदार घराण्यांतलंच आहेना? मग यांत आश्चर्य कांहींच नाहीं. कारण इथल्या सरदारांनांतर आ-पल्या बायकोचा;–बहिणीचा अगर मुलीचा तुमच्याशीं अशा प्रकारचा संबंध झाल्याबद्दल उलट आनंदच वाटणार आहे.

राजपुत्र–तसं तर खरंच! पण तिचा बाप रणधीरराव,–त्याला सरदारी देववली पाहिजे. बाबांजवळ मी ही गोष्ट काढणार नाहीं. ह्मणून तूं आमच्या बाबांसाहेबांकडे जा. आणि त्यांच्याकडून ही सरदारी त्याला देवीव.

गुलाबराव–काय? विलासदुर्गच्या राजवाड्यांत मी जाऊं? आणि त्या थेरड्या राजाला भेटूं? हें पहा, प्रत्यक्ष सैतानाला देखील भेटायला मी भिणार नाहीं,–तेव्हा राजे-साहेबांची गांठ घ्यायची मला बिलकुल धास्ती वाटत नाहीं. पण हें काम कसं फत्ते करायचा आपण बांट योजला आहे, हें तर मला कळूं दे.

राजपुत्र–(त्याच्या कानांत सांगून) अरे, हें असं असं केलं पाहिजे, समजलास.

गुलाबराव–समजलों, पण या पेक्षां (त्याच्या कानांत कांहीं कुजबुजून) ही युक्ती फक्कड! सरकारच्या ध्यानांत आली नां?

राजपुत्र–काय पाहिजे तें कर, मी तूं काय केलंस याचा मुळींच तपास काढूं इच्छीत नाहीं. तिकड तूं मंत्र घाल–अंगारे लाव–अगर धुपारे कर. किंवा पिशाच्च बोलाव. पण माझं काम होऊंदे, म्हणजे झालं.

गुलाबराव–आतां सगळीं कामं फत्ते झालींच म्हणून समजा. पण याच्या मोबदला मी चांगलंच बक्षीस मागेन.

राजपुत्र–या कामाबद्दल तूं मला कांहींही बक्षीस मागितलंस तरी तें मी तुला देईन.

गुलाबराव–ठीक आहे, जातों तर मी आतां विलासदुर्ग राजवाड्याकड.

राजपुत्र–जा तर मग लवकर! काम फत्ते करून मग मला तोंड दाखीव. (गुलाबराव मुजरा करून जातो.) माझं काम फत्ते व्हायला यानं काय युक्ती मनांत योजली आहे, हें माझ्या लक्षांत बिलकुल येत नाहीं. तरी पण मी खटपटीनं हळू हळू त्याची मसलत समजून घेईनच. हा गुलाबराव मोठा धाडसी–हांजी हांजीखोर, चहाड, शिंदळ आहे, म्हणून लोक मला सांगतात, पण माझ्या अनुभवावरून मला वाटतं तो खरा जिवाला जीव देणारा मित्र आहे, आणि आतां तर तो हरतऱ्हा करून माझं काम बजावणारच. (आंत बायकांचा मोठा दंगा होतो तिकडे पाहून)

अरे पण या माझ्या जिवलग दोस्तीणी आल्याच. (राधाबाई, चिमणी, सगुणी, बया, अशा चौघी येतात, त्यांच्याकडे पाहून) या माझ्या लाडक्यांनों, मारा मला मिठ्या, ह्मणजे मला ब्रह्मानंद सुखाचा अनुभव येईल. (चौघीही पाळी पाळीनें राजपुत्रास मिठ्या मारतात) अहाहा! खचीत या मृत्यू लोकांत हेंच स्वर्गसुख आहे.

राधाबाई–पण आतां स्नानाला नाहीं का चलायचं. तिकड तर शेंकडों बायका उटणी घेऊन महाराजांच्या हुकमावरून आपली वाट पहात आहेत. सख्या आतां आपलं लग्न होणार, ती पुष्पवती राजकन्या आल्यावर आमचा विसर नाहींना पडायचा ?

चिमणी–आह्मीं ब-या पडूं देऊं. आह्मीं आमच्या जाळ्यांत यांना अस्सं घेरूं. (राजपुत्राला मिठी मारते.)

सगुणी–यांना इथून तिच्याकड सोडलंच नाहीं ह्मणजे झालं–(राजपुत्राला मिठी मारते.)

बया–यांना इथंच गुंग करून मारून टाकूं. (राजपुत्राला मिठी मारते.)

राजपुत्र–माझ्यां लाडके राघे, आतां आपण अमृतपान करूं. तर काढ ते पेले, भर (राधाबाई पांच पेले भरून सर्वांना देते.)

राधाबाई–(स्वतः पिऊन) या पदार्थाची गोडीच फार–फा–फार (सर्व पोरी हंसतात) हं! टारग्यांनो कायग हंसता, मला कांहीं अजून जास्त–जा–जास्त नाहीं झाली.

राजपुत्र–(हेलकावे खात) फा–फार जा–जास्त नाहीं पण–च–चला चला.

[सगळे एकमेकांवर पडतात जातात पडदा पडतो.]

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

(**स्थळ**—विलासदुर्ग राजवाड्यांतील महाल—वेळ—प्रातःकाळ—राजा सिंहासनावर बसला असून जवळ चिटणीस उभा असतां पडदा उघडतो.)

राजा—हं—हें पत्र—हें पत्र अत्तांच्या अत्तां! अत्तांच्या अत्तां! पुष्पावती राजकन्येच्या बापाकडं जाऊंदे.

चिटणीस—जसा महाराजांचा हुकूम! [पडद्याकडे पाहून] कोण आहेरे तिकड!

शिपाई—[प्रवेश करून] जी काय हुकूम?

चिटणीस—हें पत्र तावडतोब सांडणीस्वाराबरोबर अत्तांच रवाना कर.

शिपाई—[पत्र घेऊन] जी, जसा हुकूम. [जातो]

हुजऱ्या—[प्रवेश करून व राजाला मुजरा करून] महाराज, राजपुत्राकडून कुणी गुलाबराव या नांवाचा इसम आपल्या बायकोसह आला आहे; व तो सरकारची एकांतांत गांठ घ्यायची इच्छा करीत आहे.

राजा—[त्रासून] कोण कोण गुलाबराव! मी, मी त्याचं नांव ऐलकं आहे. प्रधानाला याची सगळी माहिति आहे; आणि तो नेहमीं ह्मणतो कीं, तो एक भिकार कुत्रा आहे—भिकार कुत्रा आहे—मी नाहीं त्याची गांठ घेणार! [हुजऱ्या जाऊं लागतो पण चिटणीस त्यास खूण करून उभा करतो]

चिटणीस—महाराज, तो गुलाबराव राजपुत्राचा उत्तम दोस्त आहे. आणि तसंच कांहींतरी काम असल्याखेरीज

तो आपल्या भेटीला येणार नाहीं. तेव्हां आपण त्याची भेट घ्यावी; अशी माझी विनंती असून, हुजऱ्याला काय तो हुकूम करावा इतकंच माझं ह्मणणं आहे.

राजा—बरं आहे तुला तसं वाटतं तर येऊंदे त्याला इकड. तो फुलराव—नाहीं—बुलराव—नाहीं नाहीं गुलाबराव काय चमत्कारिक नांव!

हुजऱ्या—तर मग सरकार त्या दोघांनांही इकड आणतों. [राजा मान हालवतो तो जातो]

चिटणीस—महाराज ही कामं घेऊन मी प्रधान साहेबाकड जातो.

राजा—जा—जा पण मग मला भेट.

चिटणीस—जसा हुकूम! (जातो नंतर गुलाबराव व राधाबाई ऐटीनं प्रवेश करतात राजा त्यांना पाहून त्रासतो, व सिंहासनावरून उठून आंत जायच्या तयारीला लागतो. हें पाहून गुलाबराव व राधाबाई पुढें सरून राजाला मुजरा करतात.)

गुलाबराव—सरकार, हा मी आणि ही माझी बायको! आह्मी आपली साधीं, प्रामाणिक व नेहमींच्या व्यवहारांतलीं भोळी माणसं आहोंत. आपल्या चिरंजिवांचा आमच्यावर फार लोभ! सरकाराकड फारच महत्वाचं काम असल्यामुळं मी आलों. आपल्या या ताबेदाराचं नांव गुलाबराव!

राजा—(राधाबाई कडे पहात) हीच तुझी बायको काय? सुरेख—सुरेख बायको आहे. ही फारच सुरेख—अतिशय

सुरेख नाहीं. पण एकंदरींत कांहीं वाईट नाहीं. चांगलीच आहे.

गुलाबराव–(राधाबाईचे कानांत पुटपुटत) या ह्मातां-ऱ्याच्या डोळ्यांना तूं आवडलीस.

राजा–(न ऐकूं आल्यामुळें त्यास) कायरे–कायरे ! आतां तूं डोळ्यांबद्दल कायससं पुटपुटलास नारे !

गुलाबराव–सरकार, मी असं ह्मटलं; सरकारच्या डोळ्यांनां, ही माझी कारभारीण आवडली.

राजा–मग ! तसं ह्मणायला आह्माला कांहींच हरकत नाहीं पण तुह्मीं दोघांनीं माझी भेट घ्यायचंका मनांत आणलं ? माझ्या मुलानं या तुझ्या बायकोशीं–कांहीं गोंधळ केला असावा असा माझा तर्क आहे.

गुलाबराव–(हंसत)नाहीं सरकार. तशातंलाच कांहीं प्रकार नाहीं. आपल्या चिरंजिवाचा माझ्यावर फारच लोभ ! व ते माझ्याशीं फार चांगुलपणानं वागतात. इचं आणि राज पुत्राचं फारच सख्य ! ह्मणून इनं सरकार चरणांजवळ यायचा फारच हट्ट धरला ह्मणूनच मी इला घेऊन आलों.

राधाबाई–(नखऱ्यानें राजाकडे पहात) राजपुत्राच्या वतीनं चार शब्द बोलण्यासाठीं आह्मीं सरकारकड आलों आहोंत. आणि आह्मीं आपल्या स्वतःसाठीं सरकाराज-वळ कांहींच मागत नाहीं. तेव्हां आमची प्रार्थना सरकार मान्य करतील अशी मला तर बाई पूर्ण आशा आहे.

राजा–(हंसत) वा: ! फारच गोड बोललीस तूं ! आवाज तरी किती मंजूळ ! दंतपंक्ती किती सुरेख ! हं ! चालुदे बाई ! बोला काय सांगायचं आहे तें.

राधाबाई—सरकार, मला इतकंच कळवायचं आहे, कीं राजपुत्राकडून दुर्दैवानं ‘मोठी’ वाईट गोष्ट झाली आहे. रणधीरराव नांवाच्या एका गरीब सरदाराच्या मुलीचं कौमार्य त्यांनीं भ्रष्ट केलं आहे. ताबडतोब बंदोबस्त झाला नाहीं तर मोठा बिकट प्रसंग गुजरेल

राजा—[घाबरल्यासारखें] प्रसंग ह्मणजे! फारच बिकट प्रसंग! छे! हें प्रकर्ण मिटवलंच पाहिजे. तो रणधीरराव गरीब असला तरी आमच्या पक्षाचा कट्टा अभिमानी, माझ्या मर्जीसाठीं तो रात्रीला दिवस ह्मणील! अगर दिवसाभर रात्र आहे असंही ह्मणेल फार तर काय? काळ्याला पांढर! पांढऱ्याला काळं सुद्धां ह्मणील! तेव्हां अवश्य तें प्रकर्ण मिटवलंच पाहिजे. अजून ते बाहेर नाहींना आलं?

राधाबाई—छे! सरकार आह्मीं तें सगळं गुप्त ठेवलं आहे.

गुलाबराव—आणि सरकाराकडून त्याला सरदारी देण्यांत येऊन योग्य नेमणूक होईल तरच सारं गुप्त राहील.

राजा—गुलाबराव, तूं फारच शहाणा मनुष्य आहेस. आणि ही तुझी बायको तर सुंदर व शहाणी दोन्हीं गुणांत प्रवीण आहे. तेव्हां असलीं घाणेरडीं त्यांची कृत्ये बाहेर न येणं यांतच अब्रू आहे. तेव्हां मी फक्त आतां एकदांच त्याची फटफजिती न होण्याकरतां रणधीररावाला सरदारी व नेमणूक कांहीं दिवसांनीं देईन. व हें प्रकर्ण कसं मिटवायचं याचा खुलासा एकांतीं या तुझ्या बायकोजवळ करतों. या तुह्मीं सुंदरबाई! इकड या, भिऊं नका.

राधाबाई—(लाजेन मान हलवीत) अंहं! मी एकटी कशी येऊं बाई.

अंक ३ रा

प्रवेश २ रा.

स्थळ–राज पुत्राचा शृंगारलेला महाल–वेळ सायंकाळ –रोषनाई झाली असून गवई लांवण्या गात आहेत. चिमणी, सगुणी, व बया अशा तिघी मद्यांचे शिसे व पेले घेऊन राजपुत्राच्या अंगाला लकटून बसल्या आहेत. व राजपुत्र मध्यें त्यांच्या गळ्यांत हात टाकून बसला आहे असें असतां पडदा उघडतो)

राजपुत्र–हं! माझ्या लाडक्यानों ! चालूंदे चैन ! भरा दारूचे पेले. सगळे आनंदांत तर्र होऊंया. (तिन्ही मुली दारूचे पेले भरून देतात) राजपुत्र व त्या तिघी दारू एकमेकांस आग्रह करून पाजतात. गाणें चालूच आहे.)ओहो! बहार मोठी बहार चालली आहे. अशा या आनंदाच्या वेळेला आलींगनांचा कसा सपाटा उडाला पाहिजे. माझ्या दोस्तिणींनों. या, मला आलिंगनाचं अनुपम स्वर्गसुख द्या! (तिघींचें व राजपुत्राचें आलिंगन) अहाहा, हेंच या मृत्युलोकांतलं स्वर्ग सूख ! (राजा एकदम येतो व हें पाहून रागानें व आश्चर्यानें थक्क होतो. चिमणी, सगुणी व बया तिघी शिसे टाकून धांदलीन पळत सुटतात गवईबोवाही पळून जातो. राजपुत्र उठून लटपटत निशेंत उभा राहातो.)

राजा–अरेरे ! काय घाणेरडेपणाहा !

राजपुत्र–(शुद्धीवर येऊन) तसं नव्हे बाबा ! (तिघी पोरीना जायची खूण करून त्या तिघी ही पळून गेल्यावर) त्या–त्या –त्या, तिघी चांगल्या.

राजा–चूप! तोंड बंद कर नाहींतर थोबाड फोडून

टाकीन्, किती हलकट तू झाला आहेस, त्या चारगट पोरी वगैरे आणल्यास इथं? अरेरे! काय ही दारूची घाण! मळमळून येतं मला! [खोकतो]

राजपुत्र—बाबा असे माझ्यावर संतापू नका. आपली स्वारी आली त्यावेळेला मी देवांची गाणीं गवय्यापाशीं शिकत होतों. माझ्या मांडीवर बसलेल्या त्या पोरी मला ताल धरायला शिकवीत होत्या. आमची मनं ईश्वरचरणीं निमग्न व्हावीं ह्मणून आह्मीं मद्याचं सेवन केलं.

राजा—[शांत होऊन] असंच असेल तर मी तुझ्या-वर रागावत नाहीं. [इतक्यांत समोर चित्रें असलेलीं हातांत घेऊन व ती आपटून रागानें] किती घाणेरड्या तसबिरा या! खास खास! तूं दारूबाज, बाहेरख्याली! उधळ्या कर्ज बाजारी गाढव बनला आहेस. पशूंत व तुझ्यांत आतां कांहींच अंतर राहिलं नाहीं.

राजपुत्र—[रागाऊन] बाबासाहेब, इथं येऊन अशा शिव्या द्यायच्या असतील तर इथून चालते व्हा, इकड तुह्मीं मुळींच न आलां तरी चालेल.

राजा—(फार रागाऊन) मूर्खा, असले घाणेरडे शब्द तूं मला बोलतोस काय? माग, माझी क्षमा माग! नाहींतर तुझ्यावर बिकट प्रसंग गुजरेल.

राजपुत्र—हो हो, असले शब्द मी तुह्मांला बोलतों, आणि माझा कांहीं एक अपराध नसतां—जे मला शिव्या देतील, त्यांनां मी असंच बोलेन, व त्याबद्दल क्षमाही मागणार नाहीं. आजपर्यंत काय तुह्मीं माझ्यासाठीं केलं आहे. माझीं कर्जं तुह्मी फेडणार आहांत—पण ती कुणाच्या

पैशांतून ? लोकांकडून घेतलेल्या पैशानच ना ? तुमच्याजवळ तुमच्या स्वतःहाच्या मिळकतीची एक फुटकी कवडी तरी आहेका ? सारा पैसा लोकांची आतडीं पिळूनच काढला आहेना ? कर्जाच्या संबंधान हें झालं. शिक्षणाच्या संबंधान पाहिलं, तर मला तुह्मीं किती वाईट कित्ता घालून दिला आहे. पण मला इतकं वाईट शिक्षण दिलं आहे तरी, उगीच तुह्माबद्दल नालस्ती करायची माझी इच्छा नाहीं. तसंच ज्यावेळेला माझ्या हातांत राज्य येईल—तेव्हां खरा राजा कसा असतो, हें सर्वांनां दाखवीन ! वाटेल तसले कर मी लोकांवर बसवीन !—मी त्यांना गांजीन—ते माझे दासानुसादास—बंदेगुलाम—माझ्या माझ्या ताटाखालचीं मांजरं आहेत, असं मी त्यांनां वागवीन.

राजा—आतां मात्र शोभतोस खरा तूं माझा मुलगा ! या लोकांना तूं एवढीशी फूस दिलीस, कीं यांनीं हात पाय पसरलेच. छिः ते कांहीं मागण मागायला आले, कीं त्यांच्यावर बाणांचा वर्षावच केला पाहिजे. दुःखाची दाद मागायाला आले, की त्यांना तलवारीचं सामर्थ्य दाखिवलं पाहिजे. त्यांनां नेहमीं तुडवलचं पाहिजे. राजावर लोकांचं प्रेम असतं, हें ह्मणण खोटं आहे. राजपदाचं त्यांना नेहमीं भय वाटेल अशा रितीनं वागलं पाहिजे.

राजपुत्र—(आनंदानें) बाबा, तुमचं माझं भांडण मिटलं हें बरंच झालं ! फक्त तुमच्या ह्मणण्याला रुकार देण्याकरतां मी त्या पुष्पवतीशीं लग्न लावायला तयार झालों आहे. आणि मालतीलाही इथून घालवून दिलं आहे. तर आतां माझं कर्ज लवकर फिटेल अशी तजवीज तुमच्या-

कडून झाली पाहिजे. व त्या रणधीररावाला सरदारी मिळाली पाहिजे.

राजा—त्याला लवकरच सरदारकी मिळेल अशी तजवीज मीं केली आहे. ते तुझ्या गुप्त लग्नाचं लोढण वाड्याबाहेर गेलेलं ऐकून मला आनंद झाला. जातो मी आतां. पण आतां लवकरच तुझं लग्न व्हायचं आहे. यासाठीं तूं आपली वागणूक नीट ठेव, वेडे वेडे छंद कांहीं दिवस तरी बंद ठेव. अत्तांच मी त्या राजकन्येची तसबीर तुला पहायला पाठिवतों.

राजपुत्र—[त्रासानें] नको नको, ती तुमच्यापाशींच ठेवा, आणि या बाबतींत एक अक्षरही काढू नका. ही माझ्यासाठीं तुम्हीं ठरविलेली बायको, कितीही सुस्वरूप असली तरी तिच्याकड नुसती पहायचीही मला इच्छा होणार नाहीं. कारण वधुवराचे नुसते हात मात्र एकमेकांच्या हातांत देण्यांत येणार आहेत. त्यांची मनं कांहीं एकमेकांच्या आधीन होणार नाहींत. या गोष्टीचं मला स्मरण झालं—म्हणजे माझ्या अंगाचा नुसता तिळपापड होतो. पण हे कर्ज फिटण्याकरतां आज मी केवळ आपला स्वतःह्याचा बळी द्यायला तयार झालों आहे. बस्स आतां या बाबतींत एक शब्दही बोलू नका.

राजा—बरं, बरं, तोंड बंद कर. (जातो.)

राजपुत्र—(त्रासानें) कोण आहेरे तिकड सटवाजी! अरे ए! [सटवाजी येतो] कायरे गुलामा, कान फुटले होते वाटतें. अरे. त्या मघाच्या पोरी गेल्या कारे ?

सटवाजी—जी सरकार त्या गेल्या.

राजपुत्र—अरेरे! तर मग फारच वाईट झालं, त्यां असत्या तर हल्लीं मला वाटत असलेली खिन्नता तशी नाहींशी झाली असती.

सटवाजी—सरकार, बाहेर कुणी एक तरूण स्त्री आली असून तिच्या मनांत आपली गांठ घ्यायची आहे.

राजपुत्र—कोण असेल बरं ती? बरं जा, तिला पाठवून दे इकड.

सटवाजी—जी. [जातो]

राजपुत्र—[पडद्याकडे पाहून] अरे, ही माझी प्रियतम कमला आली,—दुःखानं—व संतापानं ही अगदीं बेफाम झाली आहे. अशा वेळेला मी तिच्यापुढं झिंगलेला उभा राहणं,—हा माझा गुन्हाच असून तिच्या दुःखावर डागच देणं आहे. पण मला तर आपली लाजलज्जा गुंडाळूनच ठेवली पाहिजे, अरेरे! जिच्याशीं निव्वळ दगाबाजी करून सर्वस्वी गळा कापला,—तिच्यापुढं मी कसा उभा राहूं? इला धमक्या देऊन घालवावं? किंवा प्रार्थना करून इचं मन वळवावं? करूंतरी कसं मी? कांहीं सुचत नाहीं (कमलावती दुःखांत चूर झालेली प्रवेश करते. व रागानें राजपुत्राकडे पहाते. राजपुत्र भिऊन तिच्यापुढें हात जोडून मान खालीं करून उभा राहतो.) आवडते, माफ कर. जिवलगे तूं माझा धिक्कार करायला आली आहेस, हे मीं ओळखलं! आणि तसा माझा धिक्कार तुझ्याकडून न व्हावा, हें रास्तच आहे. पण झाल्या गोष्टीबद्दल तूं मला क्षमा कर. माझे अपराध विसर—आपलं मन स्थीर करून मी काय सांगतों तें ऐक तूं मला पाजी—सातपाजी म्हणशील; पण मीं सात

आहे बरं! तुझं सौंदर्य पाहून मी वेडा झालों; असल्यानं, तुझी प्राप्ती होण्यासाठीं-नरककुंडाच्या अधीपतीनं जरी माझा प्राण मागितला असता,-तरी मी तो दिला असता.

कमलावती-[दुःखानं] हाय हाय! मी इथं कशाकरतां आलें? माझे सगळे बेत ढासळले! पण तुम्हीं असं बोलू नका. तुमचं माझ्याबर एकदां तरी प्रेम होतनां?

राजपुत्र-प्रेम होतनां? वेडे तें अजूनही कायम आहे आणि आतां तरी तें पहिल्याहिपेक्षां जास्त झालं आहे. माझ्या तब्बेतखोर वडलांच्या दुराग्रही हट्टापुढं माझा नाइलाज झाल्यामुळं, विवाहांत जरी मीं आपला हात दुसरीच्या हातांत घालणार आहे-तरी माझं मन तुझ्याकडच आमरणपर्यंत गुंतून राहील. झाल्या गोष्टीबद्दल तूं मला क्षमा करून माझ्यावर पूर्ववत प्रेम करायचं मला वचन देशील, तर या लोकीं जें कांहीं सूख आहे तें सर्व मला मिळालं असं मी समजेन.

कमलावती-[दुखानें संतप्त होऊन] पुरे करा. पुन्हा असं प्रेमानं भरलेलं भाषण माझ्याशीं करूं नका, तुमचं भाषण ऐकून माझं मन दुःखांनं करपून गेलं-माझं काळीज फाटलं-आणि माझं अंतःकरण जसं कांहीं फुटत आहे. आतां मीं आपलं समाधान तरी कसं करून घेऊं? तुमचं माझ्यावर प्रेम नाहीं-आणि मागेंही नव्हतं, तुम्हीं माझ्याशीं दगाबाजी केलीत. तुम्हीं मला विसरून गेलांत, तुमच्याशीं माझं लग्न होत नाहीं असं मी ऐकलं म्हणजे तापलेलं शिसच माझ्या डोक्यावर कुणी ओतीत आहे असा मला भास होतो. अरेरे! देवा! मी अतोनात

सुखीं आहे अशा ज्या. स्वप्नांत मी आजपर्यंत होतें;–तें आतां खोट ठरलंना ? माझ्या सर्व आशा नष्ट झाल्यानां ? सर्व अंधःकार नाहींसा होऊन सत्याचा प्रकाश अत्तां पडला. हाय हाय! आतां मी काय करूं ?

राजपुत्र–(तिला आंवळून मिठी मारून डोळे पुशीत असतां) लाडके, तूं असं दुःख करूं नको. माझा फारच ना ईलाज आहे नाहींतर–

कमलावती–[त्याला ढकलून व दूर सरून] दुःखानं माझं काळीज आधीच करपलं आहे. तशांत तुम्हीं असं बोलून मला डाग देतां काय ? माझा दुर्लौकिक होण्यासाठींच तुम्हीं माझ्यावर खोटं प्रेम करीत होता.

राजपुत्र–माझ्या आवडते कमले! दुःखानं तुझंच एकटीचं काळीज फुटत आहे असं तुला वाटतं काय ? लाडके, अशी माझी खोटी निंदा करूं नको.

कमलावती–(निराशेन) अहो, माझ्या दुःखापेक्षां तुमचं दुःख पुष्कळच कमी आहे. स्त्री पुरषांचं परस्परांवर खरं प्रेम असतां जेव्हां दुःखाचा डोंगर त्यांच्यावर कोसळतो, तेव्हां त्या अबलेलाच जास्त ओझं उचलावं लागतं. नवऱ्याचं प्रेम व्यर्थ जायचं असलं, तर बिचाऱ्या स्त्रीला बळी पडावं लागतं; सर्व दुःख व सर्व दुर्लौकिकाचा वाटा तिच्या कडच–आणि असं झालं ह्मणजे तिला अल्पावकाशांतच मृत्यूमुखांत पडावं लागतं–या सगळ्या गोष्टी पुरुषांनां माहीत असून त्यांनीं आपलं अशुद्ध–आपलं खोटं प्रेम–स्त्रियांवर कां ठेवावं ? तुह्मांलाही या गोष्टी कळत असून तुम्हीं माझा घात कां केलात ? आपलं प्रेम माझ्यावर अस-

त्याचं सांगून—विषाचा पेला माझ्या तोंडाला कां लावलांत? मी आनंदी—सुखी—हास्यमुख—सामाधानवृत्ती—आणि शुद्ध अशी होतेनां? प्रेमाचापहारा माझ्या भोंवती त्यावेळेला पडला नव्हतां, पण आज माझी स्थिती—तुह्मीं अशी करून टाकलीतनां? जिकड पहावं तिकड मला निराशा—आणि दुःख हींच दृष्टीला पडत आहेत! माझी शुद्धता—माझी अब्रू—तुह्मीं हिसकावून घेतली आहे, ती माझी मला परत द्या. हें जर तुमच्याकडून होणार नाहीं तर तुमच्या थोर पदवीचा—तुमच्या थोरपणाचा—तुमच्या मोठेपणाचा काय उपयोग? जो मंत्र तुह्मीं माझ्यावर टाकला आहे तो आपला काढून घ्या. आणि मला मोकळी करा. खास सांगतें पश्चात्तापानं तुमचं अंतःकरण उद्विग्न होईल आणि तुमच्यावर पूर्ण विश्वास ठेवणाऱ्या पोरीचा तुह्मीं असा गळा कांपलात याची तुह्मांला आठवण होऊन तुह्मीं तळमळत पडाल. आणि ज्या परमेश्वराच्या डोळ्यासमोरून कुणांला केव्हांही पळून जातां येत नाहीं, त्याच्यापुढं आपण कसं उभ रहावं, या चिंतेनं तुमचं काळीज खास खास विदारण होईल.

राजपुत्र—आवडते, दुःखानं तूं आपलं काळीज करपवूं नकोस. हे बघ माझा नाइलाज आहे. तुझ्या मनांत असेल तर तुला मी एकांतस्थळीं ठेवतों, मग तर झालं. पण तुझं माझं लग्न होणार नाहीं माझी प्रीती मात्र तुझ्यावर आहे. तर असं वेड्यासारखं न करतां मला आलिंगन दे. (तिला राजपुत्र आलिंगन द्यायला जातो ती त्याला जोरानें ढकलून धावूं लागते व हात आपटून.)

कमलावती–सरा, दूर व्हा. माझं डोकं फिरून माझ्या मनांत निरनिराळ्या कल्पना येऊं लागल्या आहेत,–आणि क्षणोक्षणीं माझे विचार पालटत आहेत. या साऱ्या भिंती नाहींशा होऊन–त्यांचा वाराच बनातो आहेसं मला वाटतं सगळं जग आज माझ्या डोळ्यासमोर उभं राहात आहे. आणि कुणाच्या अंतःकरणांत काय चाललं आहे–हें मला आतां स्पष्ट दिसूं लागलं आहे. माझ्या डोळ्यावरची अंधेरी गेली,–मी तुमच्या कामवासनेला बळी पडलें–आणि तुह्मीं आपला डाव साधलांत.

राजपुत्र–तूं संतापल्यासारखी बोलत आहेस शांत हो मन स्थीर कर. ये मी तुला पलंगावर नेतों. [तिला धरायला जातो ती त्याला जोरानें ढंकलून देते.]

कमलावती–हां! खबरदार! तुह्मीं मला हात लावूं नका. तुह्मीं निव्वळ अधमाधम सर्प आहांत. [इकडे तिकडे धांवत व वेड्यासारखे हात करून नाचत.] धांवा, धांवा, धांवा, ढग, अस्मान फोडीत आहेत. हा पहा मेला यम–धर मेल्या मला कशीं धरतोस तें पहातें मी–मी–दाखिवतें तुला तमाशा, (धांवत आंत जाऊं लागते इतक्यांत सटवाजी व दोन राजपुत्राचे हुजरे धांवत येतात.]

राजपुत्र–अरे पहाता काय ? दार बंद करून तिला धरा. [सटवाजी व दोन नोकर दार बंद करून तिला धरतात. ती वेड्यासारखे हातवारे करून डोळे फिरिवते.

कमलावती–घात! घात! घात! झालाग बाई माझा सोडा मेल्यानो, नाहींतर ठार करतें पहा तुह्मांला!

राजपुत्र–लाडके कमले शुद्धीवर ये. असं वेड्यासारखं

करूं नको. माझ्याकड एकदांतरी पहा. [तिला धरून वारा घालूं लागतो ती राजपुत्राला व त्याच्या तिन्ही नोकरांना रागानें झिडकारून वेड्यासारखें हातवारें करीत नाचू लागते.)

कमलावती–[मोठ्यानें हंसत] मेल्यानों, मी या राज्याची स्वामीनीं आहे. माझा हुकूम ऐका, नाहींतर कडक शिक्षा देईन तुह्मांला ! [रडत] मेलेग बाई, उरांत कोठा फुटला ! कसं करूं ? [पुन्हां हंसत] ही–ही–ही–ही मला सिंहासन बसायला द्या.

राजपुत्र–अरे चाकरानों पाहतां काय ? तिला पकडा. [नोकर तिला पकडतात ती वेडी होऊन हंसते व रडतें] अरेरे ! इला तर पुरतं वेड लागलं ! काय अघोर इच्यावर प्रसंग हा ! असो इला बरं करण्याची कांहींतरी तजवीज पाहिली पाहिजे. (पडदा पडतो)

अंक ३ रा.

प्रवेश ३ रा.

(स्थळ–सरदार रणधीररावांचे गृह–वेळ–प्रातःकाळ–लीळावती एक पत्र वाचीत प्रवेश करते पडदा उघडतो.)

लीलावती–(रडत) अगबाई, देवा शेवटीं असं झालं अं ! पण हें पत्र पुन्हा वाचल्याशिवाय याचा मतलब लक्षांत येणार नाहीं (पत्र वाचते)

लीलावतीबाई यांस–

राजपुत्राचे फार फार प्रेमपूर्वक रामराम–एका अत्यंत नाजूक गोष्टीच्या संबंधानं आज तुह्माला हें पत्र लिहीणं भाग पडलं आहे. तर आपल मन शांत करून गंभीरराव

जे सांगणार ते नीट ऐका, अत्तांच माझ्याकड माझी भव-डती कमला आली होती मी तिची पूर्ण ममतेनं गांठ घे-तली,—हें ह्मणजे तुह्मांला कळिवलं पाहिजे असं नाहीं. तिचं समाधान करण्यासाठीं जेवढं ह्मणून तिला सांगतां येण्यासारखं होतं, तेवढं मी सांगितलं. पण तिचं दुःख अ-नावर झालं, आणि ती फारच अजारी झाली. तशा स्थितींत तिला तुमच्या घरीं पाठिवलं असतां तुमच्या वडिलांना सर्व गोष्टी कळतील. आणि तसं होणं चांगलं नाहीं असं वाटून मी तिला तुमचे मित्र सरदार गंभीररावांच्या ता-ब्यांत दिलं आहे कळावें प्रेमाची वृद्धी व्हावी.

तुह्मांवर प्रेम करणारा.

राजपुत्र.

[रडत] अरेरे! मांगा माझ्या बहिणीचा असा गळा कापलास अं! देव तुझं कधीं कधीं चांगलं करणार नाहीं. मेल्या त्या देवाच्या न्यायदृष्टीपुढून तुला आपली पापं कधींही छपवून ठेवतां यायचीं नाहींत. अक्का मला पुन्हां भेटेल कां? ती मला केव्हां भेटेल असं झालं आहे. देवा! देवा! काय तरी अनर्थाचा प्रसंग हा, [पडद्याकडे दचकून पाहून] पण हे कोण येताहेत? हो—तेच—तेच! अगबाई पण हे आलेच. (गंभीरराव येतो) प्रिया, अक्काकडची काय खबर? ती जिवंत तरी आहेनां? मला असं भय पडलं आहे कीं तुह्मीं ती मेली ह्मणून सांगतां कीं काय!

गंभीरराव—छे! लाडके, अशा भलत्याच कल्पना मनांत आणूं नको. शरीरानं ती खुशाल आहे.

लीलावती—हं हं! समजलें मी असां तिला काय

झालं आहे तें? तिला वेड लागलं आहे. गरीब बिचारी माझी बहिण! त्या गळेकापूनं तिचा किती तरी घात केला आहे! त्यानं कांहींतरी नवीन पाजीपणा केला असेल! देवा! तू त्याचं वाटोळं कर—त्याचा चांगला सूड घेतला पाहिजे—पण नको बाई!! तो माझ्या बहिणीवर कांहींतरी दया करो,—आणि माझ्या बहिणीवर! देवा तू तरी कांहीं दया कर! (मोठ्यानें रडते गंभीरराव तिचे डोळे पुशीत)

गंभीरराव—लाडके, असा अनिवार शोक करूं नको. तुझी कल्पना कांहीं खोटी नाहीं. ती खचीत वेडी झाली. पण थोडं तुझं मन शांत कर.

लीलावती—अंहं! नाहीं माझं मन शांत होणार! आतां कांहींतरी व्यवस्था केलीच पाहिजे. आतां बाबापासून ही गोष्ट लपवून ठेऊन उपयोग नाहीं. सारी हकीगत त्यांना सांगितलीच पाहिजे,

गंभीरराव—अवडते! थोडी शांत हो. सारंच बिघडून गेलं आहेसं मानू नको. कदाचित् कमलावतीची प्रकृती ताळ्यावर येईल.

लीलावती—[रडत] अरे देवा! असं होईल कां? छेबाई! असं कुठून घडून यायला? तिची तब्बेत सुधरायची मनालातर बाई आशाच वाटत नाहीं.

गंभीरराव—लाडके, ऐक माझं! तू शहाणी, विचारी, सुस्वभावाची आहेस. तुह्मां दोघाबहिणीतलं प्रेम फारच विलक्षण आहे. असं भगिनीप्रेम कुठही अढळणार नाहीं. पण या वेळेला शहाणपणानं काय केलं पाहिजे? याचा विचार कर. कमलावतीची जितकी काळजी घ्या-

यला पाहिजे तितकी राजपुत्राच्या हुकमानं घेतली जात आहे. आणि तिचा उत्तम बंदोबस्त ठेवला आहे. तेंव्हां साऱ्या गोष्टीबद्दल उगीच डांगोरा पिटवून शोभा करूं नये. अशी राजपुत्राची तुला विनंती आहे. व माझंही मत, तांला माला पाहिल्याशिवाय बभ्रा करूं नये असंच आहे. आतां तुझ्या बापाच्या संबंधानं ह्मणशील–तर त्याच्याजवळ ही सारी गोष्ट सांगून–तुझ्या बहिणीवर त्याचा राग होणार नाहीं असा बंदोबस्त करायची हमी राजपुत्रानं माझ्यासमक्ष शपथपूर्वक घेतली आहे.

लीलावती–तुमच्याकरतां मी स्वस्थ बसेन–पण माझी बहीण अगदीं वेडी झाली आहे कांहो? ती बडबडत असतेकां? अगदीं उदास झाली आहे, नां?

गंभीरराव–मधून मधून ती बडबडते! उदास होते. रागावते. अशी चमत्कारिक तिची स्थिती आहे. हुशार वैद्याचं तिला औषध सुरूं आहे–तिची तुझी भेट मीच करून देतों–पण! चल आतां तिकडे–तो पहा–तुझा बाप येतो आहे. (दोघे जातात. नंतर रणधीरराव व एक हुजऱ्या प्रवेश करतात.)

रणधीरराव–[उत्सुकतेनं] ! काय ! काय! ह्मणतोस राजेसाहेब अत्तां इथं येणार? माझ्या गरिबाच्या घरीं ! खरच का हें ?

हुजऱ्या–अगदीं खरं! ते पहा आलेच!

रणधीरराव–(पाहून व आनंदानें भांबावून इकड तिकड धाऊं लागतो.) आतां त्यांचा सत्कार कसा करूं ?

राजा–[सहपरिवार प्रवेश करून] रणधीरराव, आजपा-

सूनें तुह्मांला सरदारीची पदवी दिली आहे.

रणधीरराव–(फारच हर्षानें हंसत) मला? मला–मला गरिबाला सरदारी?

राजा–हो, हो, तुह्माला नेमणूक ही मोठीच दिली आहे.

रणधीरराव–(मोठ्यानें हंसत) मला? मला–मला नेमणूक? सरकार खरचं कां हे? हः हः हः हः (मुजरा पुष्कळ वेळ करून) तर मग मी सरकारचा मोठा सरदार झालों ह्मणांयचा? पण सरकार असं कसं झालं?

राजा–जरा पुढं सरा तुमच्या कानांत सांगतों.(परिवारास) जारे तुह्मीं बाहेर! (दोघांवांचून सर्व जातात व रणधीरराव भीत भीत राजाजवळ जातो) ही पदवी व नेमणूक तुह्मांला द्यायचं असं गुप्त कारण आहे कीं, माझ्या मुलाच्या दृष्टीला तुमची कमला नांवाची सुस्वरूप मुलगीं पडली; आणि त्याचं तिच्यांवर मन बसून त्या मूर्खानं तिला भ्रष्टही केलं. त्याच्याचमुळं हल्ली तिला वेड लागलं आहे. पण अशा रितीनं तुह्मांला जें दुःख झालं आहे. त्याबद्दलचाच हा थोडासा मोबदला आहे. समजलांत कां?

रणधीरराव–सरकारची केवढी मोठी तरी मेहेरबानगी माझ्यांवर झाली. अतीशयच औदार्य हे! खरंच मी आतां सरदारच आहेंना आपला?

राजा–खचीत तुह्मीं सरदार आहां. बरं आतां मी जातों.

रणधीरराव–माझ्याकडून आदरसत्कारांत कमी पडलं आहे, पण हें मला हर्षवायू झाल्यानच घडलं, याबद्दल सरकारांनी क्षमा करावी.

राजा–(हंसत) तुह्मांला खचीत हर्षवायु झाला आहे.

पुढं केव्हांतरी आदरसत्काराचा वचपा मला काढतां येईल. आतां मी जातों. (जातो त्याला आदबीनें पोंचवायला रणधीरराव जातो नंतर रागावलेली लीलावती प्रवेश करते)

लीलावती—काय बाबांनीं केलं हें! छे, अगदी गैर! अगदीं गैर! आपल्या मुलीच्या भ्रष्टपणाबद्दल सूड घ्यायचा सोडून जसं ताटाखालचं मांजर ते बनले अं! देवा काय हा दुष्ट प्रसंग. (रणधीरराव हर्षानें येतो.)

रणधीरराव—कोण आहेरे तिकड लोक! सगळे मला आदबीनं लवून सलाम करून "सरदार रणधीरराव" असं ह्मणा. मी आतां पूर्वींचा गरीब राहिलों नाहीं. तर श्रीमान सरदार झालों आहे. (ऐटीनें इकडे तिकडे फिरून) खचीत! खचीत मी सरदार आहे. (लीलावतीस पाहून हर्षानें व आदबीनें) मुली यापुढं मी पूर्वींचा भिकारी रणधीरराव नाहीं. मला सरदार अशी मोठी पदवी राजेसाहेबांकडून मिळाली आहे. शिवाय नेमणूक! तर आतां मला सरदार ह्मणत जा बर कां.

लीलावती—[रागानें व तिरस्कारानें] बाबा, तुमच्या मुलीची—तुमच्या त्या—गरीब कमलेची हकीगत तुह्माला कळली असतां ही तुह्मांला दुःख न वाटतां, तुह्मीं आनंदांतच निमग्न झालां आहांना? खचीत बाबा! असं करणं तुमच्या वयाला शोभत नाहीं.

रणधीरराव—(ऐटातें) बस्स बस्स. मुली कमलेची खरी हकीगत आतां गुप्त राखण्यावांचून सोयच नाहीं. राजपुत्रानं असं घाणेरडं काम करायंच नव्हतं; पण झाल्या गोष्टीला उपाय नाहीं. योग्य मोबदला तर राजेसाहेबांनीं

वतः मला दिला आहे, मी आतां सरदार आहे बर कां?

लीलावती–बाबा, तुमच्या एका मुलीच्या तोंडाला अशी काळोखी लावल्याबद्दल ही मिळालेली सरदारी व नेमणूक तुह्मीं स्वीकारतां काय? मी तुमच्या पायांपडतें तुह्मी या सरदारीचा धिक्कार करा. खचित धिक्कारच करा.

रणधीरराव–(त्रासानें) पोरी तूं मला शहाणपण शिकवतेस काय? चल जां, मी सरदार आहे. असलं रडगाणं लावूं नको.

लीलावती–(रागानें) अरेरे! बाबा तुमच्या मुलीच्या तोंडाला काळोखी लावून तुमच्या कमलेचा सर्वस्वी घात केला असतां त्या अपराधाची फेड ह्मणून तुह्मीं ही पदवी व नेमणूक पत्करलीत काय? ठीक आहे तर मग आज पासून आपल्या घरांत मी तोंड दाखवायलाही येणार नाहीं. मी उपाशी मरत असलें तरी अक्काचा गळा कापून त्याबद्दल फेड करण्यासाठीं दिलेल्या नेमणूकींतून–मिळणाऱ्या एका पैलाही मी शिवणार नाहीं. घेतेंतर आतां मी तुमचा निरोप. (नमस्कार करून जाते)

रणधीरराव–(आत्मगत) जाईनास गेलीस तर आतां मी सरदार झालों आहे, नवं लग्न करतों, पोरं काय खंडीभर सुद्धां होतील. चैन, बस्स चैन, या ह्मातारपणांतच ज्वानीचा रंग भोगला पाहिजे. हे कपडे जाळून भपक्याचे केले पाहिजेत–बस्स भपका–मी सरदार साहेब आहे.

(जातो पडदा पडतो)

अंक ३ रा.

प्रवेश ४ था.

(स्थळ—सरदार गंभीररावांचा दिवाणखाना—वेळ—दोनप्रहर—दिवाणखान्यांतील बिछाना वगैरे आणखी ही तेथं असलेलें सामान विस्कटून टाकलें आहे. मध्यें पलंगावर वेडी झालेली कमलावती बसली असून तिनें डोकीला कागदाचा मुगूट घातला आहे व हातांत कागदाचा दंड घेतला असून सर्वांगावर फाटके कागदाचे कपटे पडले असतां पडदा उघडतो.)

कमलावती—(चर्या खिन्न व त्रस्त असून वेडी झाल्यानें विचारशक्ती नष्ट झालेली) अरेरे! पूर्वी माझ्या पुढं स्वर्गसुखं उभीं असत! पण आतां अग्नीकुंडांतल्या यातना उभ्या आहेतसं मला वाटतं! जी आनंदवृत्ती पूर्वी देवरायाच्या राज्यांतील सुखस्थानापर्यंत उड्डाण मारीत होती! ती पार ढांसळून जाऊन,—पूर्ण दुःखानं मला ग्रासून,—इह लोकच्या असह्य, यातनांचे डोंगर माझ्यापुढं उभे आहेत. (हंसत झोकानें) पण मी राजाची बायको आहे. माझा हुकूम सगळ्यां मेल्यांनीं ऐकलाच पाहिजे! (निराशेनें कागदाचा मुगुट व दंड फेकून देऊन) छेगबाई, असला कसला मुगुट मला घालायला आणला आहे. छे! असला घाणेरडा मी कधीं घालायची नाहीं. (हंसत) माझे प्रियकर मला कसा एक छान मुगुट आणून देणार आहेत. (शंकेनें) पण ते अजून कां बरं येत नाहींत? (चिमणीकडे पाहून) ते पहा ते पहा—ते कसे माझ्याकडं हात करून उभे आहेत. पण

हे मेले मला त्यांच्याकड कां, जाऊं देत नाहींत ? नाहीं—नाहीं—सोडा मेल्यांनों मी जाणार त्यांच्याजवळ—आणि मेल्यांनों तुह्मी मला तिथं न जाऊं दिल. तर मी मोठमोठ्यानं ओरडून हें सारं घर दणाणून सोडीन ! (दुःखानें उसासा टाकून) हाय हाय ! माझा घात ! सर्वस्वी घात झाला ! विंचवांनीं नांग्या मारल्यासारख्या मला वेदना होताहेत ! देवा ! नाहींच ना तूं माझ्यावर दया करणार ? कितीतरी भयंकर ही पिशाच्चं मला दिसताहेत ! देवा मी तुझ्या पायां पडतें. अहो ! धावा ! धावा ! देवा दया करटे माझ्यावर

[रडूं लागते इतक्यांत लीलावती तेथें येते व तिची स्थिती पाहून गाहिंवरून रडूं लागते. पण दुःख आवरून तिच्याजवळ जाऊन तिच्या गळ्यांत हात घालून]

लीलावती—अक्का, तू मला ओळखलंस कां ?

कमलावती—(तिच्या पासून दूर होऊन तिच्या तोंडाकडे पहात आश्चर्यानें) हो, ओळखलं ! मी तुह्माला ओळखलं। तुह्मी देवलोकच्या गंधर्वकन्या असून,—शेकडों वेळ—माझ्या स्वप्नांत आल्या अहांत. आणि प्रेमानं व ममतेनं तुह्मी माझं चुंबनही केलं आहे. तुह्मी सुंदर पुष्पांची आणि कोंवळ्या सूर्य किरणांची अधि देवताच अहांत. स्वप्नांत मी तुह्मांला किती तरीवेळा पाहिलं आहे. पण जागेपणीं एकदां देखील पाहिलं नव्हत, आं ! हें काय ! तुमच्या डोळ्यांतून पाणीकां येत आहे ? तुह्मी कां रडतां ? अरेरे ! आह्मां माणसां प्रमाणं तुह्मी देवलोकच्या गंधर्वकन्या ही रडतांना ? पण हें तुमचं रडणं माझ्या साठींचकां आहे ? असेल तर रडा, मी अगदींच अभागी—अतोनात अभागी आहे. हो

हो ! मला सारी आठवण झाली. माझं पहिलं घर मला अठवलं. माझ्यावर ममता करणारीं माणसं तेव्हां होतीं, तीं माझ्याकड आनंदानं पहात,-माझ्याशीं प्रेमानं बोलत,–आणि आनंदानं माझा हात धरीत,–हो हो ? आठवल्या त्या साऱ्या गोष्टी मला तेव्हांच्या ! पण हें कांहीं माझं घर नाहीं. हा मोठा तुरंग आहे. तें पहा कसे लोखंडी गज ठोकले आहेत, तो पहा कसा लोखंडी कठडा आहे. आणि इथलं मेलं दार तर सदाबंदच असतं. हो हा तुरुंगच आहे. खचीत तुरुंग !

लीलावती–(आपल्या बहिणीला उराशीं धरून रडत) अक्का, काय तुझी स्थिती झाली आहे. माझ्या अवडते कमले ! तूं नाहींना मला ओळखलंस ?

कमलावती–(तिच्या पासून दूर होऊन) आं ! माझं नांव तुह्मी घेतलंत काय ? मला तुह्मी हांक मारली काय ? अहा हा ! किती तरी गोड नांव आहे हें ! मला फार आवडलं !

लीलावती–(दुःखानें) हाय हाय ! देवा ! काय तरी अनर्थाचा प्रसंग हा ! माझ्या आवडत्या अक्कावर गुदरलेला हा प्रसंग पाहून मलाच वेड लागेलसं वाटतं !

कमलावती–वेड ! अहाहा ! हे सारजग वेड्यांनींच भरलं आहे. मी मात्र एकटी शहाणी ! एक ह्मातारावैद्य नेहमीं माझ्याकड येत असतो. आणि कांहींना बाईच विचारतो, माझी नाडी पहातो, आणि माझ्याबद्दल मोठी कळकळ दाखिवतो. पण तो मेला अगदीं वेडा आहे. तसंच दुसरी एक ह्मातारी येते तीही वेडीच ! तुह्मी देखील मला वेड्याच दिसतां ! (गंभीरराव येतो त्याकडे पाहून)

हा देखील खराच वेडा बरं! सगळे मेले वेडे! धरा. मेल्यांनों मला कशी धरतां तें. (पळून जाते.)

लीलावती—(रडत) अगबाई, प्रिया माझी अक्का जर वेडांतून बरी झाली नाहीं तर मी खरस वेडी होईन.

गंभीरराव—लाडके, तूं माझा अंगिकार केलाच आहेस. तर आतां आपण दोघंही मिळून इला नीट करायची खटपट करूं, यशदाता परमेश्वर आहे.

लीलावती—मला आपल्या सारखे भाग्यवान पती मिळून मी सुखांत आहे, पण माझी लाडकी बहीण मात्र अत्यंत दुःखांत आहे, याचं मला फारच दुःख होतं, मरण दिखील बरसं वाटतं!

गंभीरराव—प्रिये तूं असं वाईट वाटून जिवाला संताप करून घेऊं नको, पण चल, तुझी बहीण त्या खोलींत आहे तिथं जाऊं!

[जातात पडदा पडतो.]

अंक ३ रा.

पवेश ५ वा.

(स्थळ—विलासदुर्ग राजवाड्यातील राजपुत्राचा रंगमहाल रोषनाई झाली आहे—वेळ—रात्र—लग्न झाल्यानंतर झोंकदार पोशाखानें राजपुत्र प्रवेश करतो बरोबर राधाबाई ही उंची पोषाखानें येते पडदा उघडतो.)

राजपुत्र—माझ्या मैत्रिणी, त्या पुष्पवतीबरोबर तूं आज सारादिवस होतीस. तेव्हां तिची चालचलणूक तुझ्या

लक्षांत आलीच असेल. तिच्याशीं माझं लग्न. तर झालंच. तर सांग बरं, ती माझी बायको मुला योग्य आहे कां?

राधाबाई—काय सांगू तुम्हांला? तीं तुम्हाला शोभण्या-सारखी बायको मुळींच नाहीं. तुमच्यावर माझं अतोनात प्रेम आहे यामुळं तुमच्यापाशीं माझ्यानं खोटं बोलवत नाहीं. आणि मोकळ्या मनानं सारा प्रकार सांगावासंच वाटतं! तुमची बायको दिसायला कांहीं वाईट नाहीं, पण ती नाजूक दिसत नाहीं; आणि शहाणीही नाहीं. तिचे डोळे मोठे आहेत, पण त्यातलं पाणी दांडगेपणाचं आहे. पुढचे दांत चांगले आहेत, पण भारीच किडलेले!

राजपुत्र—काय? खरचकां असं आहे?

राधाबाई—[त्याच्या गळ्यांत हात घालून] अगदीं खरं! मी तुमच्याजवळ कां खोटं बोलेन? ती दोनतीनदां मोठ-मोठ्यानं हांसली, तेव्हां मी स्वतः तिचे दांत पाहिले आहेत त्यावरून माझी खात्री झाली आहे.

राजपुत्र—अरेरे! या एका गोष्टीवरूनच तिच्या एकंदर स्वरूपाची परिक्षा झाली. छे! फारच वाईट आहे ती.

राधाबाई—ऐका आतां तिचं बारिक वर्णन! तिचे केंस तांबूस आहेत. नाक फेंपाणं आहे. भोंवया तर तिला मुळींच नाहींत. ओटराठ असून, बांध्यान ती अगदीं ठेंगणी आहे. आणखी एक तुम्हांला सांगायचं राहिलंच. (लाजून) पण मी नाहीं बाई तुम्हाला तसलं अचकट विचकट सांगणार.

राजपुत्र—(तिच्या गळ्यांत हात घालून) हे काय बरं प्यारी? माझ्यापाशीं न सांगतां तूं चोरून ठेवणार होय? अंहं! असं नाहीं सांगच.

राधाबाई—तुमच्या आग्रहापुढं माझा तर बाई नाइलाजच होतो. (हंळू व मोठ्यानं त्याच्या कानांत) असं असं आहे.

राजपुत्र—(खिन्नतेनं) अरेरे ! फसलों ! अजीबात फसलों मीं !

राधाबाई—एकंदरींत ती राजकन्या कांहीं तुमची बायको शोभत नाहीं. असली हेडंबा तुमच्यासारख्या राजपुत्राची बायको व्हायला योग्य नाहीं. पण ती आतां खास खास तुमची बायको झाली.

राजपुत्र—(दुःखानें हात पाय आपटींत) अरेरे ! आतां मी काय करूं ? त्या हडळीशीं लग्न करायचं मी नाकारलं असतं तर बाबांनीं माझ्या कर्जाची फेड मुळींच केली नसती. जुलमानं माझ्या गळ्यांत त्यांनीं हें लोढणं बांधलं आहे. आतां मी करावं तरी काय ?

राधाबाई—प्रियकरा, तुह्मीं असे खिन्न होऊं नका. लवकरच तुमची व तुमच्या नववधूची या रंगमहालांत गांठ पडायची आहे. ते पहा, सरदार रणधीरराव व तुमची बायको इकडच येत आहे.

राजपुत्र—आग लाव त्या बायकोला. व या रंगमहालाला ! पण हें पहा ! माझं लग्न झालं आहे, तरी माझ्या अवडत्यानां कांहीं मी अंतर देणार नाहीं. तुला आतां मी कधीं सोडणार नाहीं. चल लाडके, माझं मस्तक त्रासानं तापलं आहे. तर खूप मद्यपान करून हें ताळ्यावर आणूं.

[मिठी मारून दोघे जातात. नंतर थाटाचा पोशाख करून राजकन्या पुष्पवती. व वृद्धसरदार रणधीरराव प्रवेश करतात.]

पुष्पवती–तुह्मीं आजपर्यंत मला वरचेवर उपदेशांच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्या आहेत; पण मेलीं माझी अठवणं एखाद्यां चाळणीं प्रमाणं आहे ! तिच्यांत शिल्लक ह्मणून कांहीं रहात नाहीं. आणि खरं ह्मणाल तर मला वांटतं, मला इथं उगीच आणलं. मी आपल्या सौराष्ट्रांत असून आपल्या हरिणांची काळजी घेत असतें, आणि आपल्या पांखरांनां दाणें घालीत असतें, तर किती तरी मला आनंद झाला असता.

रणधीरराव–सरकार, असे उद्गार आपल्या तोंडानं आपण काढूं सुद्धां नका. व असलं कधीं बोलूं नका. राजपुत्राची स्वारी कदाचित् दरवाज्याजवळ आली देखील असेल.

पुष्पवती–मनाला जे वाटलं, तें बोलायला काय हरकत आहे ?

रणधीरराव–हां ! असं ह्मणू नका बाईसाहेब, दरबारी संप्रदायाला अनुसरून असं ह्मणणं वाजवीं नाहीं.

पुष्पवती–पण अवडेल त्या प्रमाणं मनांत विचार येऊं द्यायला तर हरकत नाहींना ? या देशांत माणसांनां अवडेल त्याप्रमाणं मनांतल्या मनांत विचार करायची तरी त्यांनां परवानगी आहेनां ?

रणधीरराव–नाहीं सरकार, तशी सुद्धां परवानगी नाहीं. दरबारच्या पद्धती प्रमाणं आपले विचार असले पाहिजेत. आपलं बोलणं, बसणं, उठणं, हलणं, हीं सुद्धां संप्रदायानं घालून दिलेल्या रितीविरुद्ध असून उपयोगी नाहींत.

पुष्पवती–अगबाई, तर मग ही मोठीच, चमत्कारिक

संप्रदाय पद्धत! तुमच्या या शिष्टाचाराच्या जखडून टाकणाऱ्या बंधनांनीं लोक आपली बोलणीं चालणीं मुद्धां विसरायचे.

रणधीरराव—होय बाईसाहेब, राजेसाहेबापुढं उभं असतांना लोक मुकेच असतात. दरबारांत राजेसाहेबांस-मोर उभं असतांना खऱ्या राजनिष्टेशिवाय दुसरा विचारच मनांत येतां उपयोग नाहीं. मनाच्या कितीही सरळ आणि खऱ्या वृत्ती असल्या, तरी त्या दाबल्याच पाहिजेत. फार काय राजेसाहेबापुढं उभं असतांना आपल्या स्वतःहाला मन आहे ही गोष्टच विसरून गेलं पाहिजे.

पुष्पवती– [एकदम भुईवर बसून] अगबाई! चाली रीतींचा मोठाच कचाटा हा!

रणधीरराव—बाईसाहेब, पण आपली ही अशी एक-दम बसण्याची तऱ्हा आमच्या राजपुत्रांना आवडायची नाहीं.

पुष्पवती—कां बरं नाहीं आवडणार? पाय दुखूं लागल्यावर खालीं बसणं यांत कांहीं पाप नाहीं.

रणधीरराव—असोत अगर नसोत. तुम्हीं पाय दुखायचं बंद केलंच पाहिजे. दरबारी चाली रितींत ही गोष्ट शोभणार नाहीं. प्रत्येक घांस घेतांना, पाऊल टाकतांना, वागतांना, बोलतांना, बसतांना, उठतांना,—आणि कांहींही करतांना—दरबार, आणि दरबारची चाल रीत यांचं तुम्हीं स्मरण ठेवलं पाहिजे.

पुष्पवती—[त्रासानें] तरमग मनांत विचार करायची सुद्धां मला मोकळीक नाहीं. पूर्वी बायकांचं पाऊल वाकडं

पडलं कीं, त्यांनां जिवंतपुरीत! त्यांतलाच प्रकार हा!

रणधीरराव—बाईसाहेब असल्या वाकडं पाऊल पडायच्या गोष्टी आपण उच्चारूं नयेत. दरबार रीतीविरुद्ध आहे हें!

पुष्पवती—वाः ही तुमची दरबारी रीत फारच कडक!

रणधीरराव—यांत काय संशय!

पुष्पवती—हं! तर मग मी माझं स्वताहाचं कातडं टाकून—नवं कातडं चढिवलं पाहिजे ह्मणायचं!

रणधीरराव—बाईसाहेब माफ करा हा आपण अत्तांच बोलतांना योजलेला "कातडं" शब्द फारच घाणेरडा. असे शब्द वापरायची दरबारांत वहिवाट नाहीं.

पुष्पवती—(मोठ्यानें हांसून) काय तरी मेली चमत्कारिक वहिवाट!

रणधीरराव—सरकार हें असं हंसण नीट नाहीं. हें संप्रदाय विरुद्ध आहे.

पुष्पवती—(हंसत) ही जखडबंदी तर फारच विलक्षण!

रणधीरराव—हां! असा जखडबंदी शब्द वापरूं नये.

पुष्पवती—माझं कोणतंच ह्मणणं तुह्माला अवडत नाहीं. तर मग मीच गप्प बसतें कशी! पण एक तुह्माला विचारतें, मामंजी असे वेड्यासारखे कां दिसत होते?

रणधीरराव—(तोंडाला हात लावून) हां, हां, काय हें? राजेसाहेबांबद्दल—!!

पुष्पवती—आणि सासूबाई तर शुद्ध डाकीण बाईच मला वाटल्या—

रणधीरराव—(भिऊन मागें पुढें पहात.) काय हें? काय हें? राणीसाहेबांबद्दल असले शब्द—

पुष्पवती–व राजेसाहेबांजवळ पुष्कळ सरदार उभे होते. ते ! त्यांतले तर कांहीं खून करणाऱ्या मांगा प्रमाणं दिसत, व कांहीं चोरा प्रमाणं !

रणधीरराव–पण ते पहा राजपुत्र आलेच. आतां मी रजा घेतों. (रणधीरराव मुजराकरून जातो पुष्पवती लाजून उभी राहाते. व राजपुत्र त्रासलेला असा येतो.)

राजपुत्र–बसा तुह्मीं पाहिजे तर, स्वस्थ झोंप घ्या, कांहीं हरकत नाहीं. आज आपला जो हा विवाह झाला आहे. तो सोय आणि राजकारण,–यांच्याकडच निव्वळ दृष्टी देऊन झाला आहे. तुमचं मन माझ्यावर बसल्यामुळं अगर मला तुह्मीं अतोनांत आवडूं लागल्यामुळं कांहीं आपले हात एकमेकांच्या हातांत पडले नाहींत. आपणां दोघांच्या मनांत एकमेकांविषयीं प्रेमाचा लेशही नाहीं, व पुढंही जडण्याचा संभव नाहीं. तेव्हां एकमेकांनीं एकमेकांच्या मार्गांत आडकाठी आणायची नाहीं एवढा तुह्मीं निश्चय ठरवा ह्मणजे दोघांनांही आनंदानं राहतां येईल.

पुष्पवती–[हात जोडून] महाराज, याचा अर्थ तरी काय ?

राजपुत्र–अर्थ इतकाच, आजपासून नांवाला मात्र माझी बायको ! रहायला तुह्मीं कबूल असलं पाहिजे. मला वाटेल त्या रीतीनं सुख घ्यायची तुमची मला मोकळीक पाहिजे.

पुष्पवती–हं, एवढंचना तुमचं ह्मणणं ? माझ्याशीं उघड संबंध तोडायची तुमची इच्छा नसली, ह्मणजे झालं. मी आपल्या आज्ञेबाहेर कधींही वागायची नाहीं.

राजपुत्र–तर मग स्वस्थ झोंप घ्या ! लोक व्यवहारांत

मी तुह्मांला अगदीं पत्नीसारखी वागवीन. पण एकांतांत मात्र आपला प्रेमसंबंध मुळींच राह्मणार नाहीं.

पुष्पवती–हुकूम करायचा आपला अधीकार असून, तुह्मीं, सांगाल तें निमूटपणानं ऐकावं हा माझा धर्मच आहे

राजपुत्र–तर मग स्वस्थ झोंप घ्या!! रात्र फार झाली. (पुष्पवती पलंगावर पांघरूण घेऊन निजते राजपुत्र तिच्याकडे पहात) बाबांनीं नाहक्क ही घोरपड माझ्या गळ्यांत बांधली आहे. पण मी इला सुख, कसं तें मिळूं द्या यचा नाहीं. सतत इचा छळ करून शेंवटीं इला मृत्यू मुखांतच घालायची अगर काडी तरी मोडून टाकायची खटपट मी करीनच. कधीं सोडणार नाहीं. असो आतां तिकड जावं. (जातो)

पुष्पवती–(पलंगावरून उठून पुढे येऊन) देवा, एवढ्या-च साठींकां मीं यांची बायको झालें! यांच्याशीं लग्न लावायचं, मी कबूल केलं नसतं, तर किती तरी बरं झालं असतं. पण आता शोक करून काय उपयोग? आलेल्या भोगाला निमूटपणानं सादर होऊन गरीबीनं दिवस काढावे हेंच काय तें आतां मला उरलं आहे. थोडी जरी माझ्याकडून चूक झाली तरी माझा घात होईल आमचं लग्न नुकतचं झालं नाहीं, तोंच स्वारी काडी मोडायच्या तजविजींत! देवा! माझ्यावर कृपा आतां तुझ्यावांचून कोण करणार? तूंच मला चांगलं वागायची बुद्धी दे!

(पडदा पडतो.)

अंक ३ रा.

प्रवेश ६ वा.

स्थळ—विलासपूरशहरांतील सरदार रवळोजीरावांचा दिवाणखाना—वेळ—दोनप्रहर—लावण्यलतिका उत्तम पोषाखानें बसली असतां पडदा उघडतो.)

लावण्यलतिला—(आत्मगत सुस्कारा टाकून) कोण मेला उकाडा होतो आहे हा! माझं लग्न होऊन सात वर्षं झाली, तरी अजून मला नवऱ्याचं सुख कसं तें मुळींच ठाऊक नाहीं. फक्त नांवाला मात्र यांच्याशीं लग्न झालं आहे. माझ्या आईबापांनीं निव्वळ यांच्या थोर संपत्तीला भुलून क्रूरपणानं माझा बळी दिला आहे. माझं त्यांच्यावर प्रेम जडल्यामुळं कांहीं माझं त्यांच्याशीं लग्न झालं नाहीं. माझ्या मनांत त्यांच्याविषयीं, प्रीतीचा, लेशही नाहीं. लोकांनां मात्र आमचं जोडपं सुखीं असावंस वाटतं. पण खरा प्रकार अगदीं उलट आहे. कधीं एका बिछान्यावर निजणं नाहीं, बसणं नाहीं, उठणं नाहीं कीं कांहीं नाहीं. सगळंच मेल त्यांच थंड! बरं, माझ्यावर राग असेल ह्मणावं,—तर तसंही कांहीं, दिसत नाहीं. उलट वर कांतीं तर ते माझ्यावर तोंडानं, व प्रत्येक, बाबतींत ते प्रेमच करतात तेव्हां असं काय ह्मणून? खऱ्या नवऱ्याचं नातं ते माझ्यावर कां नाहीं गाजवीत? मला तर बाई फारच गूढ पडलं आहे. [दबकून पडद्याकडे पाहून] अगबाई! पण त्यांचीच स्वारी इकड येत आहे. [उभी रहाते]

रवळोजीराव—[प्रवेश करून] मी असा एकाऐकीं,

आंत आलों याबद्दल क्षमा कर. पण तूं अशी एकांतांत असतां तुझ्या महालांत येण्याचा धीर करण्यापूर्वी, तूं एकटीच आहेस अशाबद्दल मी आपली खात्री करून घेतली होती.

लावण्यलतिका—आपल्या मर्जीला येईल तेव्हां, माझ्या महालांत यायचा आपल्याला हक्कच आहे.

खळोजीराव—[दुःखानें] हक्क! तूं असं खोंचून—काळजाला घर पाडून—कां बरं बोलतेस! मीं मूर्खपणा व दुष्टपणा करून माझ्यासारख्या प्रेतांशीं तुझं लग्न लावून घेतलं याबद्दलचे विचार, रात्रंदिवस माझ्या मनांत घोळून मला कडक शिक्षा लावीत आहेत

लावण्यलतिका—अरे देवा! महाराज, माझ्याशीं असं बोलूं नका तुह्मी!

खळोजीराव—अहाहा! इतकं जरी प्रेम तूं दाखिविलंस तरी तेवढ्यासाठीं देखील मी पाहिजे तितकं द्रव्य खर्चायला तयार होईन.

लावण्यलतिका—मी तुमच्याशीं प्रेमानं वागावं, ह्मणून तुमचे सारखे प्रयत्न सुरू आहेत. तसंच मी दिखिल देवाजवळ रोज " आपणांवर माझं प्रेमबसूदे " अशी प्रार्थना करीत असतें. पण मी कृतघ्न—भारीच कृतघ्न आंहे. माझ्यासाटीं तुह्मीं किती तरी झटत आहां! सुख देणारा प्रत्येक पदार्थ तुह्मीं माझ्याजवळ ठेवला आहे. माझ्या मनांत कल्पना येण्यापूर्वींच ती तुह्मीं तृप्त करीत आहां. माझ्या भोंवतीं सोन्याचे ढीगच्या ढीग पडले आहेत. आणि निव्वळ उदारपणानं माझ्या सर्व नातलगांनां तुह्मीं धनवान

केलं आहे. तरी मी तुमच्याशीं अगदीं कठोरतेनं वागत आहे. सुखाचा एक शब्द ही मी तुमच्याशीं बोलत नाहीं. मी तुमचा अगदीं कंटाळा करतें. तरी पण याबद्दल तुह्मीं मला एक शब्द ही वाकडा न बोलतां, निमुटपणानं सगळं सहन करतां. पण मला क्षमा करा. माझे अपराध पोटांत घाला. (दीन मुद्रेनें हात जोडून) मला क्षमा करा, तुह्मीं इतके चांगले—इतके उदार—आहां. तर मी यापुढें तुमचे उपकार स्मरून,—तुमच्याशीं प्रेमानं वागायला झटेन. (ती जवळ सरते हा मागें सरतो.)

खळोजीराव—[भीतीनें व दुःखानें कावरा बावरा होऊन] हं! हं ! मागं सर मागं सर! अरेरे! काय प्रसंग हा !

लावण्यलतिका—(खिन्नतेनें) हं ! सांगा, मला क्षमा करतां कां ?

खळोजीराव—[सुस्कारा टाकून] च्छे! च्छे ! मींच तुझी क्षमा मागितली पाहिजे.

लावण्यलतिका—नाहीं; मींच तुमची क्षमा मागितली पाहिजे—मीच तुमच्याशीं कठोरतेनं वागलें आहे—मीच कृतघ्नपणा दर्शविला आहे. मी लहरी, क्षणिक वृत्तीची—घटकोघटकी बदलणारी, अशी बायको आहे ! असं तुह्मीं मानित असाल नां ?

खवळोजीराव—[दुःखानें डोक्यावर हात मारून] अरेरे! कशाला मी लग्न केलं,—कुठली त्या वेळेला वाईट बुद्धी सुचली मला ! घात ! माझा घात मीच करून घेतला ! [रडतो.]

लावण्यलतिका—क्षमाकरा, क्षमाकरा मला ! माझ्या मुळं तुह्मांला दुःख होतं, तेव्हां किती तरी दुष्ट मीं आहे !

खळोजीराव—पुन्हां " मला क्षमा करा " असं म्हणू-नको माझे इतके अपराध आहेत—कीं मीच तुझी क्षमा मागितली पाहिजे. निव्वळ मी स्वार्थपरायण होऊन दुष्ट-पणानं तुला माझी बायको करून दुःखांत पाडलं आहे. अशुद्ध—आणि वेडगळ कल्पनांच्या नादीं लागून फक्त लोका—चारा, करतां,—तुझा मी आपल्याला जो निव्वळ बळी घेतला त्याच्याविषयीं मला अत्तां पश्चात्ताप होत आहे (रडूं लागतो.)

लावण्यलतिका—(त्याच्याजवळ जाऊन गळ्यांत हात घालते) हं ! हं ! असं काय बरं दुःख करावं ?

खळोजीराव—(तिचा आपल्या गळ्यांतील हात काढून टाकून जात असतां) माफ कर मी जातो नाइलाज आहे माझा ! (पळून जातो.)

लावण्यलतिका—(आत्मगत) नेहमीं मेलं असंच ! जरा अमळ जवळ गेलं कीं पार निघून जातात. या काम वासनेनं तर मला भंडावून सोडलं आहे. जिवाची सारखी तळमळ होते. (दचकून पडद्याकडे पाहून) बरं, पण हे राज-पुत्र इकडच कां बरं येत आहेत. कांहीं कामासंबंधानं आले असतील. (उभी राहाते.)

राजपुत्र—[प्रवेश करून प्रेमानें तिच्याकडे पहात] बाई, सरदार खळोजीराव बाहेर गेले आहेत ते परत केव्हां येतील ? आपल्यापाशीं मला एका महत्वाच्या गोष्टीसंबं-धानं बोलायचं आहे.

लावण्यलतिका--इतक्यांत कांहीं ते यायचे नाहींत. महत्वाचं काम ! आणि ते माझ्याकड काय आहे ?

राजपुत्र—[डोळे मिचकावित] माझ्या येण्याचं कारण तुम्हीं ओळखलंच असेल. [हळू कानांत] पण आपलं बोलणं कुणी ऐकणार तर नाहींना?

लावण्यलतिका—छे, कुणीही ऐकणार नाहीं.

राजपुत्र—[तिचा हात धरून] सुंदरी मी तुझ्यावर फार फिदा झालों आहे, तर माझी इच्छा तृप्त कर. एवढंच मागणं आहे. आणि हीच माझी गुप्त गोष्ट. लाडके याबद्दल तूं मला क्षमा कर माझ्यावर रागाऊं नको. [चुंबन घेण्याचा प्रयत्न करतो ती झिटकारते]

लावण्यलतिका—[काम वासनेला दाबून लज्जेनें दूर सरून] दूर व्हा मी कोण हें आपण विसरलां वाटतं!

राजपुत्र—[लोचटपणानं जवळ जात असतां] जिवलगे, माझ्याकडून तुझा जो अपराध घडला त्याबद्दल मला क्षमा होईपर्यंत मी इथून जाणारच नाहीं.

लावण्यलतिका—आपण विनाकारण मला गोंधळांत पाडीत आहां.

राजपुत्र—मोहिनी, तुझं सौंदर्य व सुशीलता पाहून मी फिदा झालों आहे. माझा अंगिकार करायचा सोडून एखाद्या विद्रूप राक्षसाच्या हातांतून आपला हात हिसकावून घ्यावा, तसा तूं माझ्या हातांतून आपला हात घेतलास अं! [तिला मिठी मारून चुंबन घेत असतां] हे बत्र प्रियकरणी, तूं माझ्याशीं कठोरतेनं वागूं नको. खरंच, माझं मन तुला पाहून वेडं झालं आहे.

लावण्यलतिका—(त्याच्यापासून झटक्यानें दूर होऊन) आपण अशी माझी थट्टा करूं नये.

राजपुत्र—मी इतक्या खऱ्या मनानं बोलत असतां तुला अशी थट्टा कां वाटते ? लावण्यलतिके ! मी शपथ वाहून सांगतों,—तूं माझा अव्हेर करशील तर मी पूर्ण निराश होईन.

लावण्यलतिका—[गोंधळून कामोत्कंठेनं] आपण असं काय बरं मला करतां ? यानं माझं मन कसं चंचल झालं आहे.

राजपुत्र—(तिला आलिंगन देऊन) अहाहां ! यावेळेला मी आनंदसागरांत तरंगत आहे.

लावण्यलतिका—(त्याला ढकलून त्याच्यापासून दूर होऊन) व्हा दूर ! आपल्या पाशांत मी सांपडलें आहे असं बिलकुल मानू नका. आपण एकदम मला धरल्यामुळं,—माझा थोडा गोंधळ होऊंन मी फसलें खरी ! पण तुमच्याकडून असा उपमर्द पुन्हां होतां उपयोग नाहीं. चला आतां इथून जा मला काम आहे.

राजपुत्र—जातो तर, (आत्मगत) अग गर्विष्ठे, मी तुला आपलीशीं केल्याशिवाय कद्धीं सोडणार नाहीं. (जातो)

लावण्यवती—(मनाशीं) हे राजपुत्र असून किती तरी लोचटपणा करीत होते. पण खरंच यांची बोलण्याची ढब, व मनोहर स्वरूप पाहून मी दिखील फसत होतें. (राधाबाई प्रवेश करते तिच्याकडे पाहून) तुम्हीं आज येणार ही गोष्ट मी अगदींच विसरलें होतें.

राधाबाई—आपली मर्जी असेल तर मी जातें, व पुन्हां सांगाल तेव्हां येईन.

लावण्यलतिका– नको, तसं करायची गरज नाहीं. पण तुह्मीं स्वतः बुट्टे काढलेला आणला कां तो काळा शालू !

राधाबाई–हो, हा इंथच हजर आहे. (काळा शालू दाखविते ती तो लक्षपूर्वक पहाते.)

लावण्यलतिका–वाः बाई तुह्मीं आपल्या कामांत फारच निपुण आहां बरं !

राधाबाई–बाईसाहेब, आपण माझी अशी तारिफ केली इतक्यांनच मला आनंद झाला. पण आपण फारच सुंदर असून–हा पोशाख आपल्याला फारच शोभेल. आमच्या राजपुत्रसाहेबांना तर असलाच फार आवडतो. बाईसाहेब माफ करा राजपुत्र वरचेवर आपल्या सौंदर्याची आपल्या आकृतीची, आपल्या मनोहर गतीची व आपल्या गोड चालीरितींची तारिफ करतात. पण आपल्याला राग येईल,–ह्मणून मी पुढचं बोलतच नाहीं कशी ?

लावण्यलतिका–मला अगदींसुद्धां राग नाहीं. हं चालू दे.

राधाबाई–राजपुत्र नेहमीं आणखी ही असं ह्मणत असतात. "लावण्यवतीबाईसारख्या सुंदर स्त्रीचं वर्णन जितकं करावं तितकं थोडं ! खरच, असल्या सुंदर बायकोचं रूप पाहून जो तिची पुजा करूं लागणार नाहीं तों निव्वळ मूर्खच ह्मटला पाहिजे."

लावण्यवती–त्याचं ह्मणणं तुह्मीं सांगतां यांत कांहीं तिखट मीठ तर नाहींना ?

राधाबाई–बाईसाहेब, मी आपल्या पदरचं एक अक्षर ही सांगितलं नाहीं. जसं ते ह्मणाले तसंच्यातसंच मी आपल्याला कळिंवलं.

लावण्यलतिका—खरंच असल्या गोष्टी मी ऐकणं,—यांत माझाच वेडेपणा आहे.

राधाबाई—बाईसाहेब, मला क्षमा करा मी त्यांचं ह्मणणं कळिवलं ह्मणून. पण राजपुत्रांचं मन खास तुमच्यावर अतोनांत बसलं आहे.

लावण्यलतिका—अहोबाई, राजपुत्रांनीं सहज माझ्याविषयीं चार चांगले शब्द काढले, एवढ्यावरून तुह्मीं ह्मणतां तसं त्यांचं मन माझ्यावर जडलं आहे असं होत नाहीं.

राधाबाई—बाईसाहेब, खरी हकीगत मी जर तुमच्या जवळ सांगेन—तर तुह्मीं माझ्यावर रागावाल मात्र!

लावण्यलतिका—बरं तर मी नाहीं रागावणार. पण सांगा तर पाहूं काय खरी हकीगत आहे ती.

राधाबाई—बाईसाहेब, ऐका तर मग राजपुत्राचं आपल्यावर मन बसलं आहे,—त्यांनां सतत आपलंच वेड लागलं आहे,—ते सर्वकाळ आपलंच चिंतन करीत असतात.

लावण्यलतिका—पुरे करा, असलीं बोलणीं मी ऐकणं देखिल वाजवी नाहीं.

राधाबाई—बाईसाहेब, मी ह्मटलंच होतं कीं, आपण माझ्यावर रागावाल! पण मी करावं तरी कसं? आपण माझं बोलणं ऐकतां—खरी हकीगत सांगण्याविषयीं मला हुकूम करतां,—आणि पुन्हां माझ्यावरच रागावतां!

लावण्यलतिका—खरंच, माझीच चूक आहे या कामीं मीच तुह्मांला ती हकीगत सांगायला लावलं. एकूण त्यांचं